रेग्युलर दिवाणी दावा क्र.११२/२०२१
नि.क्र.२४/ क (सोबत)

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

दावा मिळकत ही गायरान जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही १९९० पासून महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे. साक्षीदार सांगतो की, १९९४ पासून पिकवारीवर १ हे. २० आर आमचे नाव लागले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टामध्ये माझी व माझ्या भावामध्ये तडजोड झाली होती व सदर दाव्यामध्ये देखील प्रस्तुत दाव्यातील ७/१२ उतारे दाखल करण्यात आले होते. सदर दावा मी दावा मिळकतीची मालकी घोषीत होऊन मिळणेकामी दाखल केला आहे. दावा मिळकत ही सध्या माझ्या ताब्यात आहे. साक्षीदार सांगतो की, मला सदर जमिनीचा ताबा नको आहे, ७/१२ वरील जमिनीचा नोंद करुन पाहिजे. मी दाव्यामध्ये वाद मिळकतीचा जो ताबा मागितला आहे तो चुकीचा आहे. सदर २२ गुंठे जमीन माझ्या ताब्यात असल्याबाबत व शासनाच्या नावे सदर जमीन चुकीच्या आधारे लागल्याबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर गट क्र.३७४ मधील संपूर्ण जमीन पुर्वीपासून आमच्या ताब्यात कशी आली आहे याबाबत मला माहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३७४ मधील २२ आर जमीन १९७४ पासून शासनाच्या नावे असून ती त्यांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन आमच्या ताब्यात नसून आम्ही तिथे फक्त गुरे चारण्याचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्याचे कारण ३०/१२/२००० रोजी घडले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासाचे शपथपत्र वकीलांनी टंकलिखीत करुन ठेवले होते व मी त्यावर फक्त सह्या करुन न वाचता न्यायालयात सादर केले. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवर माझे अथवा माझ्या पुर्वजांचा कधीही ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, महाराष्ट्र शासन आमच्या ताब्यात येऊन कधीही अडथळा केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्याअगोदर १२ वर्षापुर्वी मी प्रतिवादींना विनंती केला नाही व त्यांनी कधीही माझी विनंती अमान्य करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या लोकांकडे शेत नाही त्या व्यक्ती सदर जमिनीत जाऊन गुरे चारतात. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद जमिनीचा कधीही कायदेशीर मालक होवू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही महाराष्ट्र शासनाची असल्यामुळे ७/१२ उताऱ्यावर गुरंचरण हा शब्द वगळून मागण्याचा आम्हाला अधिकार नाही. गुरंचरण हा शब्द कमी होण्यासाठी मी प्रतिवादी यांच्याकडे लेखी कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उताऱ्यावर सदर गुरंचरण हा शब्द कमी होण्यासाठी सदर दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीचे भाव वाढल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे जमीन बळकावण्याच्या हेतुने मी सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार नसताना मी चुकीच्या आधारे बेकायदेशिररित्या सदरचा दावा दाखल केला आहे. नियमाप्रमाणे ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव यायला पाहिले याबाबत मी काहीही सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत
(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

दि.१३/०१/२०२५